| MHGO030012382023 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | २८ | ०३ | २०२३ |
| | नोंदणी दिनांक | : | २८ | ०३ | २०२३ |
| | निकाल दिनांक | : | १३ | ०८ | २०२६ |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०३ | ०४ | १६ |

**मुख्य न्यायदंडाधिकारी, गोंदिया यांचे न्यायालयात**

**[पीठासीन अधिकारी श्रीमती यो. कृ. राऊत]**

**नियमीत फौजदारी खटला क्रमांक १२२/२०२३**

निशाणी क्रमांक **– ५६.**
गुन्हा रजि. क्रं. ४४१/२०२२
पोलीस स्टेशन, गोंदिया शहर

| | | | |
|---|---|---|---|
| अभियोगपक्ष | : | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस स्टेशन,गोंदिया शहर,<br>ता. जि. गोंदिया. | |
| अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ | : | सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. एस. कुलकर्णी | |
| **– विरुध्द –** | | | |
| आरोपी क्र. | : | १ | **राजु मधुप्रसाद टेंभरे,**<br>वयः– २४ वर्षे, धंदाः– मजुरी,<br>राहणारः– गोंगलई ता. गोंगलई, जि. बालाघाट म. प्र. |
| | | २ | **कुलदीप रामु गौतम,**<br>वयः– २६ वर्षे, धंदाः– मजुरी,<br>राहणारः– बुढैना खुर्द पो. स्टे हट्टा ता. जि. बालाघाट म. प्र. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३ | **राकेश हरीचंद्र बिरनवार,**<br>वयः– २४ वर्षे, धंदाः– मजुरी,<br>राहणारः– तिनटोला नवेगांव ता. थाना रामपायली |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | : | श्री पी. एस. श्यामकुवर आणि के. बी. चिखलोंडे. | |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | २८.०६.२०२२ |
| पहीली खबर दिनांक | : | २९.०६.२०२२ |
| दोषारोपपत्र दिनांक | : | २८.०३.२०२३ |
| आरोप निश्चित दिनांक | : | १३.०९.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | २८.१२.२०२३ |
| न्यायनिर्णयाकरीता निश्चित केल्याचा दिनांक | : | १३.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | : | १३.०८.२०२६ |
| शिक्षेचा दिनांक, असल्यास | : | –– |

## <u>आरोपींची तपशील</u>

| **आरोपी क्रमांक** | **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जामीनावर सुटल्याची तारीख** | **गुन्हा कलम** | **निर्दोष अथवा दोषी** | **शिक्षेचा तपशील** | **कलम ४४३ फौ.प्र.संहितेच्या अनुषंगाने संपरीक्षे दरम्यान कोठडीतील कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **राजु मधुप्रसाद टेंभरे,** | १०.०२.२०२३ | २०.०३.२०२३ | भा.दं.वि. चे कलम ३७९ सहकलम ३४ प्रमाणे | निर्दोष | – | निरंक |
| २. | **कुलदीप रामु गौतम,** | १०.०२.२०२३ | २०.०३.२०२३ | भा.दं.वि. चे कलम ३७९ सहकलम ३४ प्रमाणे | निर्दोष | – | निरंक |
| ३. | **राकेश हरीचंद्र बिरनवार,** | १०.०२.२०२३ | १३.०२.२०२३ | भा.दं.वि. चे कलम ३७९ सहकलम ३४ प्रमाणे | निर्दोष | – | निरंक |

## अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

**अ) अभियोगपक्ष –**

| क्र. | नाव | | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|---|
| १. | परेश रमेशकुमार अनवानी | : | फिर्यादी. |
| २. | दिपक जगतराम आहुजा | : | घटनास्थळ पंच. |
| ३. | पो. हवा. दिपक गोविंदा रहांगडाले | : | तपासी अधिकारी. |
| ४. | राहुल चैनलाल गौतम | : | साक्षीदार. |

**ब) आरोपी तर्फे साक्षीदार, असल्यास**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

**क) न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यास**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

## अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालयाचे निशाणी क्रमांकाची यादी

**अ) अभियोग पक्ष –**

| अ. क्रं. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १. | १७/सा.क्र. १ | रिपोर्ट |
| २. | १८/सा.क्र. १ | छापील प्रथम खबर |
| ३. | ४०/सा.क्र. ३ | सूचना पत्र |
| ४. | ४१/सा.क्र. ३ | मुद्देमाल पावती |
| ५. | ४२/सा.क्र. ३ | कलम वाढीबाबतचा पत्र |
| ६. | ४३/सा.क्र. ३ | न्यायालयास दिलेले पत्र |
| ७. | ४५/सा.क्र. ४ | निवेदन पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| ८. | ४६/सा.क्र. ४ | अटक पंचनामा |
| ९. | ४७/सा.क्र. ४ | जप्ती पंचनामा |
| १०. | ४८/सा.क्र. ४ | चालान |

**ब) आरोपी /बचाव पक्षाचे साक्षीदार**

| अनुक्रमांक | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

**क) न्यायालयाचे साक्षीदार**

| अनुक्रमांक | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

## न्यायनिर्णय
## (पारित दिनांक १३ ऑगस्ट, २०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याबद्दल आरोप ठेवण्यात आला आहे.

**अभियोगपक्षाचे कथन खालीलप्रमाणे** –

**२. (i)** फिर्यादी परेश रमेशकुमार अनवानी हा शंकर चौक, सिंधी कॉलोनी, गोंदिया येथे राहतो. तसेच तो कपडा विक्रीचा व्यवसाय करतो.

**(ii)** दिनांक २७.०६.२०२२ रोजी फिर्यादीने त्याची ५०० सीसी मोटारसायकल बुलेट क्र. एमएच–३५–एके–८९९९ ही त्यांच्या घरासमोर गेटच्या बाहेर उभी ठेवलेली होती. रात्री जेवन करून अंदाजे ०१:०० वाजता फिर्यादी झोपायला गेला, तेव्हा त्याची मोटारसायकल ही घरासमोर उभी होती. दिनांक २८.०६.२०२२ रोजी फिर्यादी झोपून उठला, तेव्हा त्याची मोटारसायकल दिसून आली नाही. सदर मोटारसायकल कुणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेली. त्यामुळे फिर्यादीने गोंदिया शहर पोलीस स्टेशन येथे फिर्याद नोंदवली.

**३.** फिर्यादी परेश रमेशकुमार अनवानी यांनी दिलेल्या फिर्यादवरून गोंदिया शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक ४४१/२०२२ भारतीय दंड संहितेचे कलम

३७९ प्रमाणे अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा नोंद झाला. तपासादरम्यान पोलीस हवालदार दिपक गोविंदा रहांगडाले यांनी घटनास्थळी जावून घटनास्थळ पंचनामा तयार केला. आरोपी क्र. ३ राकेश हरीचंद्र बिरनवार याने दिलेला कबूली जबाब आणि जप्ती पंचनामा त्यांनी बालाघाट येथील कोतवाली पोलीस स्टेशन यांच्याकडून हस्तगत केला. मोटारसायकल मुद्देमाल कक्षात जमा करुन मुद्देमाल पावती तयार केली. त्यांनी सदर गुन्ह्यामध्ये भादंविचे सहकलम ३४ अन्वये कलम वाढ केली. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. पोलीस स्टेशन अधिकारी यांनी गुन्ह्याचे अन्वेषण पूर्ण केल्यानंतर आरोपींविरूध्द पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द निशाणी क्रमांक ०४ वर भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे आरोप निश्चित केला. तसेच सदर आरोप आरोपींना त्यांच्या मातृभाषेतून समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व प्रकरणाची संपरीक्षा करण्याची विनंती केली.

**५.** अभिलेखावर आलेला पुरावा व अभियोगपक्षाचे विधिज्ञ व आरोपींचे विधिज्ञ यांनी केलेल्या युक्तीवादाचा विचार करुन खालील मुद्दे निर्णित करण्याकरीता उपस्थित झाले. त्यासमोर नोंदविलेले निष्कर्ष त्याखालील दिलेल्या कारणांकरिता नोंदविलेले असुन ते पुढीलप्रमाणे –

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय की, दिनांक २८.०६.२०२२ रोजी ०४:२० ते ०५:०० वाजेच्या दरम्यान मौजा शंकर चौक, सिंधी कॉलोनी, गोंदिया, ता. जि. गोंदिया येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन त्यांच्या समान उद्देशासाठी फिर्यादी परेश रमेशकुमार अनवानी यांची ५०० सीसी मोटारसायकल बुलेट क्र. एमएच–३५–एके–८९९९ त्यांच्या संमतीशिवाय चोरुन नेली आणि त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराध केला काय ? | ....नाही |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

६. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र. १ परेश रमेशकुमार अनवानी (फिर्यादी) याची साक्ष नि. क्र. १६ वर, साक्षीदार क्र. २ दिपक जगतराम आहुजा – पंच साक्षीदार याची साक्ष नि. क्र. २१ वर, साक्षीदार क्र. ३ पोलीस हवालदार दिपक गोविंदा रहांगडाले – तपासी अधिकारी याची साक्ष नि. क्र. ३९ वर आणि साक्षीदार क्र. ४ राहुल चैनलाल गौतम याची साक्ष नि. क्र. ४४ वर नोंदविली. सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्र. ४९ वर पुरसीस दाखल करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. आरोपींविरुध्द गुन्हा दर्शक बाब अभिलेखावर आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे आरोपींचा जबाब निशाणी क्र. ५० ते ५२ अन्वये नोंदविण्यात आला. आरोपींनी त्यांच्याविरुध्द सदरची खोटी केस दाखल केली आहे असे कथन केले आहे.

**मुद्दा क्रमांक १ करिता –**

७. सदर प्रकरणामध्ये साक्षीदार क्रमांक १ परेश रमेशकुकार अनवानी यांनी फिर्याद नोंदविल्यामुळे ते अभियोगपक्षाचे महत्वाचे साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या साक्षेमध्ये सांगितले आहे की, त्यांच्याकडे एक बुलेट रॉयल एनफिल्ड क्र. एम.एच.३५.ए.के.८९९९ ही मोटरसायकल आहे. दिनांक २७.०६.२०२२ रोजी त्याने सदर मोटारसायकल घराच्या बाहेर ठेवली. दुसऱ्या दिवशी उठल्यानंतर सकाळी ०९:०० वाजता पाहिले असता, त्याला सदर मोटारसायकल जागेवर मिळून आली नाही. त्यानंतर त्याने त्याच्या घरासमोरच्या प्रकाश एजेंसी या दुकानातील सी.सी.टी.व्ही. कॅमेरा तपासले. तेव्हा पहाटे ०४:०० वाजताच्या दरम्यान तीन लोक त्यांची

मोटरसायकल घेवून जात होते. त्यानंतर त्याने पोलीस स्टेशनमध्ये रिपोर्ट दिला. सदर रिपोर्ट नि. क्र. १७ वर आणि छापील प्रथम खबर नि. क्र. १८ वर आहे. त्यानंतर पोलीस घटनास्थळी आले होते. तसेच पोलीसांनी पोलिस स्टेशनमध्ये सी.सी.टि.व्ही. कॅमरे तपासले असता, त्यामध्ये ज्यांनी चोरी केली होती ते तीन लोक दिसून आले. त्यापैकी एक आरोपी राजु टेंभरे होता. पोलीसांनी त्याचा जबाब नोंदविला.

८. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये फिर्यादीने मान्य केले की, त्याने रिपोर्ट चोरी झाल्यानंतर १ ते २ दिवसांनी दिला आणि त्याला त्याच्या गाडीचा चेसीस व इंजिन क्रमांक माहीत नाही. प्रकाश एजेंसी ही फिर्यादीच्या घरासमोर नाही, ही बाब फिर्यादीने मान्य केली आहे. तसेच रात्र असल्यामुळे सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये आरोपींचे चेहरे स्पष्ट दिसत नव्हते, ही बाब सुद्धा फिर्यादीने मान्य केली आहे. सी.सी.टी.व्ही. फुटेज फिर्यादीने पोलीसांना दिले होते, ही बाब सुद्धा फिर्यादीने मान्य केली आहे.

९. साक्षीदार क्र. २ दिपक आहुजा हा घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहे. त्याने त्याच्या साक्षेमध्ये सांगितले आहे की, त्याला पोलीसांनी पंच म्हणून फिर्यादीच्या घरासमोर पंचनाम्यासाठी बोलविले होते. सदर घटनास्थळ फिर्यादीने दाखविले होते. त्याच्यासमक्ष पोलीसांनी सदर ठिकाणी घटनास्थळ पंचनामा तयार केला. सदर घटनास्थळ पंचनामा नि. क्र. २२ वर आहे. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये फिर्यादीच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर सही केली ही बाब पंच साक्षीदाराने नाकारली आहे.

**१०.** साक्षीदार क्र. ३ पोलीस हवालदार दिपक रहांगडाले हे सदर प्रकरणातील तपासी अधिकारी आहे. त्यांनी त्यांच्या साक्षेमध्ये तपासाचा भाग सांगितला आहे. त्यांनी त्यांच्या साक्षेमध्ये सांगितला आहे की, सदर गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी जावून पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला, तो निशाणी क्र. २२ वर आहे. त्यानंतर त्यांना पोलीस स्टेशन कोतवाली बालाघाट यांच्याकडून माहिती मिळाली की, आरोपींकडून २३ मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सदर गुन्ह्यामध्ये चोरी गेलेली गाडी समाविष्ट आहे. त्यांनी कोतवाली बालाघाट

पोलीस स्टेशन यांच्याकडून निवेदन पंचनामा आणि जप्ती पंचनामा याची प्रत मिळविली. त्यांनी सदर गुन्ह्यातील गाडी ही मुद्देमाल कक्षामध्ये जमा केली आणि मुद्देमाल पावती निशाणी क्र. ४१ तयार केली. त्यांनी केलेल्या तपासामध्ये आरोपींनी संगनमत करून गाडी चोरल्याचे निष्पन्न झाले. आरोपींविरुद्ध पुरावा मिळाल्यानंतरच त्यांनी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**११.** आरोपींतर्फे तपासी अधिकारी यांची उलटतपासणी घेण्यात आली. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सदर प्रकरणामध्ये त्यांनी सी.सी.टी.व्ही. फुटेज घेतली नाही, ही बाब तपासी अधिकारी यांनी मान्य केली आहे. कोतवाली बालाघाट पोलीस स्टेशन मार्फत मिळालेल्या माहितीची स्टेशन डायरीला नोंद करण्यात आली नाही, ही बाब तपासी अधिकारी यांनी मान्य केली आहे. सदर प्रकरणामध्ये फिर्यादीव्यतिरिक्त इतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले नाही, ही बाब सुद्धा तपासी अधिकारी यांनी मान्य केली आहे. परंतु विचारलेल्या इतर सूचक प्रश्नांना तपासी अधिकारी यांनी नकारार्थी उत्तरे नोंदविली आहेत.

**१२.** साक्षीदार क्र. ४ पोलीस हवालदार राहुल गौतम यांनी त्यांचे साक्षेमध्ये कथन केले की, दिनांक १८.०१.२०२३ रोजी ते बालाघाट येथील कोतवाली पोलीस स्टेशन येथे कार्यरत होते. गुन्हा क्र. ३१/२०२३ मध्ये त्यांनी आरोपी राकेश याच्या घरातून तीन मोटारसायकल दिनांक ०२.०२.२०२३ रोजी जप्त केल्या होत्या. त्याचा त्यांनी जप्ती पंचनामा तयार केला होता. त्यांनी आरोपीचे निवेदन निशाणी क्र. ४५ नोंदविले होते. त्यांनी गोंदिया शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. ४४१/२२ व ३२२/२२ मधील दोन गाड्या दिल्या. तसेच त्यासंबंधीचे दस्तऐवज सुद्धा दिले. आरोपीकडून चोरी गेलेल्या मोटारसायकल जप्त करण्यात आल्या होत्या. राकेश याने राजु टेंभरे आणि कुलदिप गौतम यांच्यासोबत संगनमत करून सिंधी कॉलोनी येथून मोटारसायकल चोरल्याची कबुली दिली होती.

**१३.** सदर साक्षीदाराचा आरोपींतर्फे उलटतपास घेण्यात आला. आरोपी क्र. १ व २ यांच्यावर बालाघाट पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल नाही, ही बाब साक्षीदाराने मान्य केली आहे. आरोपी राकेश याचे निवेदन नोंदविले, त्यावेळेस पोलीस स्टेशनमध्ये

कस्टीडीत किती आरोपी हजर होते, हे त्यांना माहीत नाही, असे सदर साक्षीदाराने उलटतपासणीत मान्य केले आहे. निवेदन पंचनाम्यावरील पंच हे पोलीस कर्मचारी आहेत, ही बाब सुद्धा सदर साक्षीदाराने कथन केली आहे. ज्या घरातून मोटारसायकल जप्त केली होती, त्या घराचा क्रमांक त्यांनी पाहिला नव्हता आणि मालकी हक्कासंबंधीचे कागदपत्र त्यांनी पाहिले नव्हते, असे त्यांनी त्यांचे उलटतपासणीत कथन केले आहे. परंतु आरोपी राकेश यांनी त्यांना निवेदन दिले नव्हते आणि सदर निवेदनानुसार त्यांनी गाडी जप्त करून पंचनामा तयार केला नाही, या बाबी त्यांनी नाकारल्या आहेत.

**१४.** अभिलेखावर आलेल्या वरील पुराव्याच्या आधारे सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. एस. कुलकर्णी यांनी असा युक्तीवाद केला आहे की, अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या साक्षेतून आरोपींनी आपसात संगनमत करुन मोटारसायकलची चोरी केली, ही बाब सिद्ध होत आहे. त्यामुळे आरोपींना जास्तीत जास्त तुरुंगवासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा करण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ खालील न्यायनिवाड्यांचा आधार घेतलेला आहे.

(i) **<u>राजु मांझी वि. बिहार सरकार २०१८ क्रि. लॉ. जरनल ४३४२</u>** या न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे अधिनिर्धारित केले आहे की,

> *"ओळख परेड हा तपासाचा एक टप्पा आहे आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये अशी कोणतीही तरतूद नाही जी तपास यंत्रणेला ओळख परेड आयोजित करण्यास बंधनकारक करते किंवा आरोपीला ओळख परेडची मागणी करण्याचा अधिकार देते. ओळख परेड ठोस पुरावा मानला जात नाही आणि ही परेड फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १६२ प्रमाणे नियंत्रीत केली जाते. ओळख परेड आयोजित न केल्याने अभिलेखावरील पुरावा अस्वीकार्य ठरत नाही."*

(ii) **<u>कर्नाटक सरकार वि. यरप्पा रेड्डी, ए.आय.आर. २००० एस.सी.१८५</u>** या न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे अधिनिर्धारित केले आहे की,

> *"तपासातील त्रुटीमुळे सादर केलेला ठोस पुराव्याचे स्वतंत्र विश्वासार्हता कमी होत नाही."*

(iii) **<u>बोधराज वि. जम्मु आणि कश्मीर सरकार, ए.आय.आर. २००२ एस.सी. ३१६४</u>** या न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे अधिनिर्धारित केले आहे की,

> *"जर खटला परिस्थीतीजन्य पुराव्यावर आधारित असेल तर गुन्ह्याचा साखळी इतकी पूर्ण आणि स्पष्ट असावी की, त्यात आरोपीच्या निरपराधेबद्दल कोणतीही शंका उरणार नाही."*

(iv) **<u>गुलाबचंद वि. मध्यप्रदेश सरकार, निर्णय दिनांक २८.०३.१९९५</u>** या न्यायनिर्णयामध्ये मा. मा. सर्वोच्च न्यायालयाने असे अधिनिर्धारित केले आहे की,

> *"खुन आणि दरोड्यानंतर जर मृत व्यक्तीचे दागिने किंवा वस्तू आरोपीकडे सापडल्यास आणि आरोपी त्याबाबत योग्य स्पष्टीकरण देऊ शकला नाही, तर त्या व्यक्तीनेच दरोडा आणि खुन केला असा थेट निष्कर्ष काढता येतो."*

(v) **<u>हिमाचल प्रदेश सरकार वि. जीतसिंग, ए.आय.आर. १९९९ एस.सी. १२९३</u>** या न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे अधिनिर्धारित केले आहे की,

> *"तपासी अधिकाऱ्याने आरोपीची चौकशी केली, तेव्हा इतर साक्षीदार उपस्थीत असणे आवश्यक नाही. जप्तीच्या कोणत्याही साक्षीदाराने आरोपीची माहिती ऐकली नाही या कारणावरुन आरोपीने अशी कोणतीही माहिती दिली नाही असे मानने पुरेसे नाही."*

आरोपींचे विधीज्ञ श्री. पी. एस. श्यामकुवर आणि श्री के. बी. चिखलोंडे यांनी असा युक्तीवाद केला आहे की, सदर प्रकरणामध्ये आरोपींकडून मोटारसायकल जप्त करण्यात आली होती, ही बाब अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या साक्षेतून सिद्ध होत नाही. अभिलेखावर आलेला पुरावा हा आरोपींविरूध्द ठेवलेले आरोप विनाशंकेपलिकडे सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामूळे आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली आहे.

**१५.** सदर प्रकरणामध्ये साक्षीदार क्र. १ परेश अनवानी याने फिर्याद नोंदविल्यामुळे तो अभियोगपक्षाचा महत्वाचा साक्षीदार आहे. त्याच्या साक्षेतून मोटारसायकलची चोरी झाली होती, ही बाब सिद्ध होत आहे. चोरी सारख्या घटनेमध्ये

घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळणे कठीण असतो. सदर बाब ही परिस्थितीजन्य पुराव्यावर अवलंबून असते.

**१६.** भारतीय पुरावा कायद्याचे कलम ११४ प्रमाणे चोरीच्या घटनेनंतर चोरी गेलेला मुद्देमाल ज्याच्या ताब्यात मिळेल त्याने चोरी केली असे गृहीत धरता येते. अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपी इसमांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीच्या मोटरसायकलची चोरी केली. सदर बाब सिद्ध करण्यासाठी आरोपींच्या ताब्यातून मोटरसायकल जप्त करण्यात आली होती ही बाब विनाशंकेपलीकडे सिद्ध करणे अभियोग पक्षाची जबाबदारी होती.

**१७.** साक्षीदार क्र. ३ दिपक रहांगडाले हे सदर प्रकरणातील तपास अधिकारी आहेत. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये सांगितले आहे की, पोलीस स्टेशन कोतवाली बालाघाट येथे २३ मोटारसायकल जप्त करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये सदर गुन्ह्यामध्ये चोरी गेलेली मोटारसायकल समाविष्ट होती, कोतवाली बालाघाट यांच्याकडून त्यांनी निवेदन पंचनामा आणि जप्ती पंचनामा यांची प्रत मिळवली.

**१८.** साक्षीदार क्र. ४ राहुल गौतम यांनी त्यांच्या साक्षेमध्ये सांगितले आहे की, गुन्हा क्र. ३१/२०२३ मधील आरोपी राकेश याच्या घरातून तीन मोटारसायकल त्यांनी जप्त केल्या होत्या. त्यांनी सदर आरोपीचे निवेदन नोंदविले होते आणि निवेदनानुसार जप्ती करून जप्ती पंचनामा तयार केला. परंतु अभियोगपक्षातर्फे निवेदन पंचनामा आणि जप्ती पंचम्यावरील पंच साक्षीदारांची साक्ष सदर प्रकरणामध्ये नोंदविण्यात आली नाही. तसेच साक्षीदार क्र. ४ राहुल गौतम यांनी निवेदन पंचनामा आणि जप्ती पंचनामा तयार करताना पंच म्हणून पोलीस कर्मचारी यांना घेतले, सदर बाब त्यांनी त्यांच्या उलटतपासणीमध्ये मान्य केली आहे. साक्षीदार क्र. ४ राहुल गौतम यांनी निवेदन पंचनामा आणि जप्ती पंचनामा हा स्वतंत्र पंच साक्षीदारांसमोर तयार केला नाही, त्यामुळे सदर प्रकरणातील निवेदन पंचनामा आणि जप्ती पंचनामा हा विनाशंकेपलीकडे सिद्ध होवू शकला नाही.

**१९.** सरकारी अभियोक्ता यांनी सदर प्रकरणातील निवेदन पंचनामा आणि जप्ती पंचनामा हा ग्राह्य धरता येईल, असा युक्तिवाद केला आहे. त्यासाठी त्यांनी **बोधराज वि. जम्मु आणि कश्मीर सरकार, गुलाबचंद वि. मध्यप्रदेश सरकार आणि हिमाचल प्रदेश सरकार वि. जीतसिंग** या न्यायनिवाड्यांचा आधार घेतलेला आहे. परंतु प्रत्येक प्रकरण हे त्या प्रकरणामध्ये उपस्थीत होणाऱ्या बाबीवरून आणि सत्य परिस्थीतीनुसार ठरवावे लागते. या प्रकरणामध्ये उपस्थीत झालेल्या बाबी आणि सत्य परिस्थीती ही **बोधराज वि. जम्मु आणि कश्मीर सरकार, गुलाबचंद वि. मध्यप्रदेश सरकार आणि हिमाचल प्रदेश सरकार वि. जीतसिंग** या प्रकरणांमध्ये उपस्थीत झालेल्या सत्य परिस्थीतीपेक्षा वेगळी आहे. त्यामुळे सदर न्यायनिवाड्यांचा अभियोगपक्षास फायदा होणार नाही.

**२०.** फिर्यादी साक्षीदार क्र. १ परेश अनवाणी यांनी त्यांच्या साक्षेमध्ये सांगितले आहे की, पोलीस स्टेशनमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तपासण्यात आले होते. त्यांनी सी.सी.टी.व्ही. फुटेज पोलीसांना दिले होते. परंतु तपासी अधिकारी साक्षीदार क्र. ३ दिपक रहांगडाले यांनी त्यांच्या साक्षेमध्ये सांगितले आहे की, सदर प्रकरणामध्ये त्यांनी सी.सी.टी.व्ही. फुटेज घेतले नाही. अशा प्रकारे फिर्यादी साक्षीदार क्र. १ परेश अनवाणी आणि तपासी अधिकारी साक्षीदार क्र. ३ दिपक रहांगडाले यांच्या साक्षेमध्ये विसंगती दिसून येत आहे.

**२१.** फिर्यादी साक्षीदार क्र. १ परेश अनवाणी यांनी त्यांच्या साक्षेमध्ये सांगितले आहे की, पोलीस स्टेशनमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तपासले असता, ज्यांनी चोरी केली होती, ते तीन लोक होते, त्यापैकी एकाचे नाव राजु टेंभरे असे आहे. परंतु आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये रात्र असल्यामुळे सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये आरोपींचे चेहरे स्पष्ट दिसत नव्हते, ही बाब फिर्यादीने मान्य केली आहे. तसेच, सदर सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासी अधिकारी साक्षीदार क्र. ३ दिपक रहांगडाले यांनी जप्त केले नाही. सी.सी.टी.व्ही. फुटेज हे पोलीस स्टेशनमध्ये पाहण्यात आले होते, या फिर्यादीने दिलेल्या साक्षेला तपासी अधिकारी क्र. ३ दिपक रहांगडाले यांच्या साक्षेतून पुष्टी मिळू शकली नाही. त्यामुळे फिर्यादी याने सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहिले होते आणि त्यामध्ये आरोपी हे मोटारसायकल चोरी करताना दिसून आले, ही बाब

विनाशंकेपलीकडे अभिलेखावर सिद्ध होवू शकत नाही. त्यामुळे **कर्नाटक सरकार वि. यरप्पा रेड्डी** या न्यायनिवाड्याचा अभियोगपक्षास फायदा होणार नाही.

**२२.** साक्षीदार क्र. ४ राहुल गौतम यांच्या साक्षेनुसार आरोपी राकेश याच्या घरातून तीन मोटारसायकल जप्त करण्यात आल्या होत्या. परंतु ज्या घरातून मोटारसायकल जप्त करण्यात आल्या होत्या, ते घर कुणाच्या ताब्यात होते किंवा कुणाच्या मालकीचे होते, याबाबतचा पुरावा अभियोगपक्षातर्फे अभिलेखावर दाखल केला नाही.

**२३.** साक्षीदार क्र. ४ राहुल गौतम यांनी त्यांच्या साक्षेमध्ये सांगितले आहे की, आरोपी राकेश याने आरोपी राजु टेंभरे आणि आरोपी कुलदिप गौतम यांच्यासोबत संगनमत करून सिंधी कॉलोनी येथे मोटारसायकल चोरल्याची कबुली दिली होती. परंतु सदर निवेदन पंचनामा हा साक्षीदार क्र. ४ राहुल गौतम यांनी स्वतंत्र साक्षीदाराच्या उपस्थीत तयार केला नाही. निवेदन पंचनाम्यावरील पंच साक्षीदार हे पोलीस कर्मचारी आहेत, त्यामुळे सदर निवेदन पंचनामा हा विनाशंकेपलीकडे सिद्ध होवू शकला नाही. तसेच, आरोपी राकेश याच्या केवळ निवेदनावरून आरोपी राजु टेंभरे आणि आरोपी कुलदिप गौतम यांचा सदर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट होत नाही.

**२४.** आरोपींवरील आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाला निवेदन पंचनामा आणि जप्ती पंचनामा विनाशंकेपलीकडे सिद्ध करणे आवश्यक होते. परंतु, निवेदन पंचनामा आणि जप्ती पंचनामा हा सदर प्रकरणामध्ये विनाशंकेपलीकडे सिद्ध होवू शकला नाही. तसेच तपासी अधिकारी यांनी आरोपींचा सदर चोरीशी संबंध आहे, हे सिद्ध करण्यासाठी फिर्यादीच्या साक्षेनुसार फिर्यादीने दिलेले सी.सी.टी.व्ही फुटेज अभिलेखावर दाखल केले नाही. सदरची फिर्याद ही अज्ञात व्यक्तीविरुद्ध देण्यात आली आहे. अभिलेखावर आलेला पुरावा हा आरोपींवर ठेवलेले आरोप विनाशंकेपलीकडे सिद्ध करण्यासाठी पुरेशा नाही. फौजदारी कायद्यानुसार शंकेचा फायदा हा आरोपींना देण्यात येतो. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नाकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबतः</u>–**

**२५.** मुद्या क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदविल्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त

होण्यास पात्र आहे. सदर प्रकरणामध्ये जप्त असलेली रॉयल इनफिल्ड बुलेट ही मोटारसायकल अपील कालावधीनंतर योग्य त्या कागदपत्राची पडताळणी करुन त्याच्या मुळ मालकास परत करणे योग्य होईल. त्यामुळे मुद्दा क्र. २ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## आदेश

१. आरोपी क्र. १ **राजु मधुप्रसाद टेंभरे**, आरोपी क्र. २ **कुलदीप रामु गौतम** आणि आरोपी क्र. ३ **राकेश हरीचंद्र बिरनवार** यांची भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनदाराचे हमीपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींना आदेशित करण्यात येते की, त्यांनी प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– वैयक्तिक बंधपत्र आणि जामीनपत्र दाखल करुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ ची पुर्तता करावी.

४. आरोपींनी फौजदारी प्रकीया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ करुन दिलेली बंधपत्रे पुढील सहा महिन्याकरीता वैध राहतील.

५. सदर प्रकरणामध्ये जप्त करण्यात आलेली मोटरसायकल ही अपील कालावधीनंतर योग्य त्या कागदपत्राची पडताळणी करुन त्याच्या मुळ मालकास परत करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YOGESHWARI KRUSHANRAO RAUT
Date: 2026.08.13 17:34:22 +0530

ठिकाणः– गोंदिया. (श्रीमती यो. कृ. राऊत)
दिनांकः– १३.०८.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, गोंदिया.